# शिक्षकांसाठी सूचना

# ६ वी मराठी

## इयत्ता : सहावी

## लेखी प्रश्नांबाबत शिक्षकांना सूचना

**प्रश्न १): शब्द ऐकून लिही.** (गुण ६)

**क्षेत्र** : लेखन (श्रुतलेखन)

**उद्‌दिष्ट** : जोडाक्षरसहित व जोडाक्षरविरहित शब्दांचे लेखन तपासणे.

**सूचना** : यादीतील शब्द सांगताना प्रत्येक शब्द मोठ्याने तीन वेळा वाचावा.

**शब्द** :

| | |
|---|---|
| १) विमान | २) खडू |
| ३) थैली | ४) अंगण |
| ५) गॅस | ६) रॉकेल |
| ७) पट्टी | ८) जास्वंद |
| ९) कात्री | १०) ज्वारी |
| ११) बर्फ | १२) राष्ट्रीय |

**गुणदान : प्रत्येक योग्य शब्दास अर्धा गुण द्यावा.**

हा प्रश्न तपासताना काही बाबी लक्षात घ्याव्यात. शब्द सलग लिहिला असेल व लेखन-नियमानुसार बरोबर असेल तरच गुण द्यावेत. उदा. 'जास्वंद' ऐवजी 'जासवंद' किंवा 'बर्फ' ऐवजी 'बरफ'/'र्बफ'/'बफ्र'असे लिहिल्यास गुण देऊ नयेत.

**प्रश्न २): हा उतारा ऐक आणि लिही.** (गुण ४)

**क्षेत्र** : लेखन (श्रुतलेखन)

**उद्‌दिष्ट** : जोडाक्षरसहित व जोडाक्षरविरहित शब्द असलेल्या मजकुराचे लेखन तपासणे.

**सूचना** :

- उतारा सांगताना त्याचा अर्थ ध्यानी यावा म्हणून एक एक वाक्य सलगपणे सांगावे.
- मग वाक्यातील शब्दांचे अर्थपूर्ण गट करून एक गट सांगून झाल्यावर काही सेकंद थांबावे. मग पुढील गट सांगावा. याप्रमाणे प्रत्येक वाक्य सांगावे.
- उतारा पूर्ण झाल्यावर संपूर्ण उतारा मुलांना सावकाशपणे वाचून दाखवावा व तपासण्यास सांगावे.

**उतारा** : आज कबड्डीची मॅच होती. मी मैदानावर पोहोचलो तेव्हा सगळे खेळाडू उत्साहात होते. खेळ रंगात आला होता. अचानक प्रमिला पडली. तिच्या पायाला खूपच लागलं. तन्मय धावत आला. त्याने प्रमिलाचा पाय पाण्याने स्वच्छ धुतला. जखमेवर कापसानें औषध लावले.

**गुणदान** :
- एकही शब्द बरोबर नाही – शून्य गुण (शिरोरेखा व पूर्णविरामाचे गुणही देऊ नयेत.)
- शिरोरेखा असतील तर – अर्धा गुण
- पूर्णविराम असतील तर – अर्धा गुण
- १–१२ शब्द बरोबर – एक गुण
- १३–२४ शब्द बरोबर – दोन गुण
- २५–३६ शब्द बरोबर – तीन गुण

**प्रश्न ३ ते ५)** हा उतारा वाच आणि दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिही. (पठित १५० शब्द) (गुण ५)

**क्षेत्र** : वाचन

**उद्दिष्ट** : वाचून आकलन तपासणे.

**उतारा** : वयाच्या तेराव्या वर्षी कस्तुरबांचे गांधीजींशी लग्न झाले. त्यावेळी त्या निरक्षर होत्या. पण घरकामाचे चांगले शिक्षण त्यांना मिळाले होते.....

**योग्य उत्तरे व गुणदान**

**प्रश्न ३ : ब)** पंचाहत्तराव्या (गुण १)

**प्रश्न ४) :** संक्रांतीच्या सणाप्रमाणे 'ईद' या सणाच्या दिवशीही त्या मिठाई वाटत.
(उताऱ्यातील तंतोतंत वाक्य अपेक्षित नाही.) (गुण २)

**प्रश्न ५) :** 'बा'ला फुलके फार चांगले करता येत. ती भांडी अतिशय सुंदर व निर्मळ घासायची. तिने लोटा घासून आणला की तो आरशासारखा स्वच्छ दिसायचा.

(फुलके आणि भांडी या दोन्हींबद्दल वाक्य लिहिल्यास २ गुण द्यावेत, फक्त फुलके चा उल्लेख असलेले वाक्य लिहिल्यास १ गुण द्यावा किंवा फक्त भांडी घासण्याबद्दल वाक्य लिहिल्यास १ गुण द्यावा.)

(उताऱ्यातील तंतोतंत वाक्ये अपेक्षित नाहीत.)

**प्रश्न ६ ते ८)** ही बातमी वाच आणि खाली दिलेल्या प्रश्नांची योग्य उत्तरे लिही. (अपठित १५० शब्द) (गुण ५)

**क्षेत्र** : वाचन

**उद्दिष्ट** : वाचून आकलन तपासणे.

**बातमी** : प्रगतशील आदिवासी शेतकरी श्री. मोचंडा पावरा यांना राज्यशासनाचा शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार मिळाला........

**योग्य उत्तरे व गुणदान**

**प्रश्न ६ : ब)** शेतीतील उल्लेखनीय कामासाठी. (गुण १)

**प्रश्न ७) :** ठिबक सिंचन प्रणालीचा वापर करून आवळा, काजू व आंबा यांची सातपुड्यात लागवड करण्याचा प्रयोग श्री. पावरा यांनी केला.

(उताऱ्यातील तंतोतंत वाक्ये अपेक्षित नाहीत.) (गुण २)

**प्रश्न ८) :** बातमी जानेवारी महिन्यातील आहे कारण उताऱ्यात 'काल प्रजासत्ताक दिनानिमित्त मुंबईत झालेल्या सोहळ्यात' असा उल्लेख आला आहे. प्रजासत्ताक दिन २६ जानेवारीला असतो.

(उताऱ्यातील तंतोतंत वाक्ये अपेक्षित नाहीत. फक्त जानेवारी महिन्यातील बातमी आहे एवढेच उत्तर लिहिल्यास एक गुण द्यावा. उताऱ्यातील कोणत्या वाक्यावरून जानेवारी महिना असल्याचे समजते हे लिहिल्यास उर्वरित एक गुण द्यावा. एकूण गुण २)

**प्रश्न ९ ते १३** (गुण १०)

**क्षेत्र :** शब्दसंपत्ती व व्याकरण

**उद्दिष्ट :** शब्दसंपत्ती व कार्यात्मक व्याकरण तपासणे.

**प्रश्न ९) :** खालील वाक्ये वाच आणि वाक्यांशी संबंधित योग्य म्हणी कंसातून निवडून लिही. (गुण २)

या प्रश्नात दोन उपप्रश्न आहेत. प्रत्येक योग्य उत्तरास एक गुण द्यावा.

**योग्य उत्तरे :**

१) पालथ्या घड्यावर पाणी.

२) अंथरुण पाहून पाय पसरावे/पसरावेत.

(अंथरुण पाहून पाय पसरणे असे लिहिल्यास अर्धा गुण द्यावा.)

**प्रश्न १०) :** वाक्यातील अधोरेखित शब्दाऐवजी कंसातील शब्द वापरून वाक्यात सुयोग्य बदल करून वाक्य पुन्हा लिही. (गुण २)

या प्रश्नात दोन उपप्रश्न आहेत. प्रत्येक योग्य उत्तरास एक गुण द्यावा.

**योग्य उत्तरे :**

१) गाय वैरण खाते.

२) गणूने जत्रेतून बाहुल्या खरेदी केल्या.

**प्रश्न ११) :** कंसातील योग्य उभयान्वयी अव्ययाचा वापर करून दिलेली वाक्ये जोडून पुन्हा लिही. (गुण २)

या प्रश्नात दोन उपप्रश्न आहेत. प्रत्येक योग्य उत्तरास एक गुण द्यावा.

**योग्य उत्तरे :**

१) आई जालन्याला गेली आणि कपडे घेऊन आली.

२) जावेद शाळेला गेला नाही कारण तो आजारी होता.

**प्रश्न १२) :** 'साक्षी अभ्यास करते.' या वाक्याचे खाली दिलेल्या काळात रूपांतर कर आणि आवश्यक ते बदल करून वाक्य पुन्हा लिही. (गुण २)

प्रत्येक योग्य उत्तरास एक गुण द्यावा.

**योग्य उत्तरे :**

१) भूतकाळ : साक्षीने अभ्यास केला.

२) भविष्यकाळ : साक्षी अभ्यास करेल/साक्षी अभ्यास करेन.

**प्रश्न १३) :** पुढील वाक्यातील अधोरेखित शब्दांऐवजी योग्य वाक्प्रचार वापरून वाक्ये पुन्हा लिही.

या प्रश्नात दोन उपप्रश्न आहेत. प्रत्येक योग्य उत्तरास एक गुण द्यावा.

**योग्य उत्तरे :**

१) पोलिसांना पाहून चोर पसार झाला.

२) ऑस्ट्रेलियाने क्रिकेटच्या सामन्यात इंग्लंडचा धुव्वा उडवला.

(पसार होणे, धुव्वा उडविणे असे वाक्प्रचार बदल न करता जसेच्या तसे वाक्यात वापरले तर प्रत्येकी अर्धाच गुण द्यावा.)

**प्रश्न १४) :** खाली काही शब्द दिले आहेत. त्या शब्दांच्या आधारे गोष्ट तयार करून लिही. (गुण ५)

**क्षेत्र :** स्व-अभिव्यक्ती (लेखन)

**उद्दिष्ट :** स्व-अभिव्यक्ती तपासणे.

**गुणदान :**

| गुण | निकष |
|---|---|
| ० | काहीही लिहिलेले नाही किंवा केवळ शब्दलेखन. |
| १ | शब्दांची नुसती सुटी सुटी वाक्ये लिहिलेली आहेत. वाक्यात सलगता नाही. |
| २ | दिलेल्या शब्दांवरून संदर्भ घेऊन सलग लेखन, काही वेळा वाक्यरचना विस्कळित असू शकेल, गोष्ट नाही, त्रोटक लेखन. |
| ३ | दिलेल्या शब्दांचा संदर्भ लक्षात घेऊन गोष्ट पूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे. |

| गुण | निकष |
|---|---|
| ४ | दिलेल्या शब्दांचा संदर्भ लक्षात घेऊन सुसंगत अर्थपूर्ण लेखन. गोष्टीला सुरुवात आणि शेवट आहे. |
| ५ | दिलेल्या शब्दांचा संदर्भ लक्षात घेऊन सुसंगत अर्थपूर्ण लेखन. गोष्टीला सुरुवात आणि शेवट आहे. गोष्ट खुलवण्यासाठी बारकावे व तपशील दिले आहेत. वेगवेगळ्या पात्रांना भूमिका / संवाद दिलेले आहेत. |

**प्रश्न १५) :** 'बालसवंगडी' मासिकात अशी जाहिरात आलेली आहे की दर महिन्याला मुलांनी केलेले लिखाण ते छापणार आहेत. त्यासाठी तू पुढीलपैकी कोणत्याही एका विषयावर लिही. (गुण ५)

**क्षेत्र** : स्व-अभिव्यक्ती (लेखन)

**उद्‌दिष्ट** : स्व-अभिव्यक्ती तपासणे.

**गुणदान :**

| गुण | निकष |
|---|---|
| ० | काहीही लिहिलेले नाही किंवा दिलेल्या विषयांचा विचार न करता केलेले असंबद्ध लिखाण |
| १ | दिलेल्या विषयांपैकी एका विषयाचा विचार करून सुट्या सुट्या वाक्यांचे लेखन. |
| २ | निवडलेल्या विषयाचा संदर्भ लक्षात घेऊन लेखन केले आहे; पण<br>• वाक्यरचना नीट नाही<br>• मर्यादित कल्पना मांडलेल्या आहेत.<br>• लेखामध्ये मांडलेल्या कल्पनांचा एकमेकांशी संदर्भ लावलेला नाही. |
| ३ | निवडलेल्या विषयाचा संदर्भ लक्षात घेऊन लिहिण्याचा प्रयत्न केला आहे.<br>• वाचकाला विषयाची नीटशी कल्पना येण्यासाठी पुरेसे मुद्दे मांडलेले आहेत.<br>• मांडलेल्या कल्पनांचा एकमेकांशी संदर्भ लावलेला आहे.<br>• कल्पनांचा/तपशीलाचा विस्तार केलेला नाही किंवा खूपच थोड्या प्रमाणात केला आहे. |
| ४ | • मांडलेल्या मुद्द्यातून विषयाची परिपूर्ण कल्पना येते.<br>• मुद्द्यांशी संबंधित उदाहरणे, स्पष्टीकरणे आढळू शकतात. पण ही कमी/मर्यादित स्वरूपाची असू शकतात.<br>• लेखाची मांडणी सुसंगत आहे. पण एक-दोन ठिकाणी लेखन मुदद्यापासून भरकटते.<br>• वाक्यरचना नीट आणि वाक्यांचा पल्ला ही वाढलेला आढळतो. |
| ५ | • मांडलेल्या मुद्द्यांतून विषयाची परिपूर्ण कल्पना येते.<br>• मुद्द्यांशी संबंधित उदाहरणे देऊन, स्पष्टीकरणातून लेखनाचा विस्तार केलेला आहे.<br>• लेखाची मांडणी सुसंगत व ओघवती आहे.<br>• मुलाच्या लेखावरील भावना सुस्पष्ट आहेत. |

# तोंडी प्रश्नांबाबत शिक्षकांना सूचना

**तोंडी प्रश्न १ :** उताऱ्याचे प्रकट वाचन करून घेणे. (गुण ५)

**क्षेत्र** : प्रकटवाचन

**उद्‌दिष्ट** : वाचून आकलन तपासणे.

**प्रश्नकर्त्यांसाठी सूचना :**

हा प्रश्न प्रकट वाचनाचे कौशल्य तपासण्याबरोबरच मुलाचे आकलन तपासण्यासाठी आहे. हा प्रश्न तोंडी असल्याने एकेका विद्यार्थ्याला जवळ बोलावून विचारायचा आहे. वर्गात जास्त मुले असल्यास चार ते पाच दिवसात हा चाचणीचा भाग पूर्ण करता येईल.

**प्रश्नकर्त्याने देण्याची सूचना :**

मी तुला एक उतारा वाचायला देणार आहे. तो उतारा मोठ्या आवाजात वाच. मग मी तुला काही प्रश्न विचारणार आहे, त्यांची उत्तरे तू द्यायची.

**उतारा :**

काल रविवार होता. मनू आई–बाबांबरोबर डोंगरावर फिरायला गेली होती. मनू तर डोंगरावर चढताना जवळ–जवळ पळतच होती. आई म्हणाली, ''अगं किती धावतेस?'' मनू म्हणाली, ''काही नाही होत गं, मला मजा येतेय.'' असे म्हणत मनू पुढे पळाली. तिला आई–बाबांच्या आधी डोंगरावर पोहचून सूर्योदय पाहायचा होता. मनू सूर्योदय बघत उभी होती. तेवढ्यात आई–बाबा धापा टाकतच आले. आईला बघताच मनू म्हणाली, ''आई, मला भूक लागली.'' आईने दिलेला लाडू मनूने लगेचच फस्त केला. मनू आई–बाबांबरोबर मनसोक्त भटकून घरी परत आली.

**वाचनासाठीचे गुणदान :**

| गुण | निकष |
|---|---|
| ० | मुलाने उतारा वाचण्यात रस दाखवला नाही, मदत करूनही वाचता आले नाही. |
| १ | मदत करून काही शब्दांचे वाचन. वाचनातून वाक्याचा बोध नाही. |
| २ | मदत न करता शब्दांचे वाचन. वाचनातून बोध नाही. |
| ३ | उताऱ्याचे प्रयत्नपूर्वक वाचन, वाचनातून वाक्याचा बोध. आधी मनात वाचून मग प्रकट वाचन चालेल. |
| ४ | काही वाक्यांचे स्वराघातासह प्रकट वाचन. |
| ५ | उताऱ्याचे स्वराघातासह प्रकट वाचन. गती महत्त्वाची नाही. वाक्यांचे परत वाचन चालेल. |

**वाचलेल्या उताऱ्यावर आधारित प्रश्न विचारणे.** (गुण ५)

**योग्य उत्तर**

**तोंडी प्रश्न २ :** मनू डोंगरावर का पळत होती? (गुण १) (क)

अ) तिला घरी जायची घाई झाली होती.

ब) तिला भूक लागली होती.

क) तिला मजा येत होती.

**तोंडी प्रश्न ३ :** मनू डोंगरावर फिरायला कोणत्या वेळी गेली होती? (गुण २) (अ)
हे तुला कशावरून समजले?

अ) सकाळी

ब) दुपारी

क) संध्याकाळी

(सकाळी असे उत्तर दिल्यास एक गुण द्यावा. सूर्योदय पाहायचा होता या वाक्यावरून सकाळी फिरायला गेली हे समजले असे सांगितले तर उर्वरित एक गुण द्यावा.)

**तोंडी प्रश्न ४ :** आई बाबा डोंगर चढताना थकले होते हे तुला कोणत्या वाक्यावरून सांगता येईल? (गुण२)

('आई-बाबा धापा टाकतच आले' असे उत्तर दिल्यास दोन गुण द्यावेत.)

■■■

## उतारा :

काल रविवार होता. मनू आई–बाबांबरोबर डोंगरावर फिरायला गेली होती. मनू तर डोंगरावर चढताना जवळ–जवळ पळतच होती. आई म्हणाली, ''अगं किती धावतेस?'' मनू म्हणाली, ''काही नाही होत गं, मला मजा येतेय.'' असे म्हणत मनू पुढे पळाली. तिला आई–बाबांच्या आधी डोंगरावर पोहचून सूर्योदय पाहायचा होता. मनू सूर्योदय बघत उभी होती. तेवढ्यात आई–बाबा धापा टाकतच आले. आईला बघताच मनू म्हणाली, ''आई, मला भूक लागली.'' आईने दिलेला लाडू मनूने लगेचच फस्त केला. मनू आई–बाबांबरोबर मनसोक्त भटकून घरी परत आली.